समर्थ सेवा मंडळ, सज्जनगड यांच्या मालकीची
समर्थ संप्रदायाची मराठीतील अग्रगण्य व विचारप्रवर्तक

# ॥ सज्जनगड ॥

## मासिक पत्रिका

आश्विन/कार्तिक शके १९३५ । वर्ष ६२ । अंक ११ वा । नोव्हेंबर २०१३ । शिवशक ३४०
वार्षिक वर्गणी ₹ २००/- । दशवार्षिक वर्गणी ₹ १५००/- । अंक केवळ वर्गणीदारांसाठी

दीपावली विशेष



दिपावली शुभेच्छा

सुखी सारे असावेत। निरोगी सर्वही तसे।
सर्वांचे चांगले होवो। न होवो दुःख ते कुणा॥

# ।। ज्ञानदीप उजळू दे ।।

– श्री. वासुदेव वामन बापट गुरुजी.
द्वारा डॉ. सौ. मेघना केळकर. ९/५/२, सरितानगरी, फेज २,
सिंहगड रस्ता, पुणे ४११०३०. संकेतस्थळ : www.yadnya.in

प्रकाशरूपाने ईश्वराची केलेली पूजा म्हणजे दीपोत्सव अर्थात दीपावली ! भारतीय संस्कृतीने प्रकाशपूजेला पूर्वापार महत्व दिले आहे. प्राचीन काळी त्याची पूजा यज्ञस्वरूपात केली गेली, ती त्याचे मानवी जीवनात असलेले अनन्यसाधारण स्थान ओळखूनच. आजच्या आधुनिक काळातही सृष्टीधारणेत असलेले प्रकाशाचे महत्व विज्ञानाने वादातीत मानले आहे. आधुनिक विज्ञानाप्रमाणे दृष्य सृष्टीतल्या पदार्थांपैकी प्रकाशाची गती सगळ्यांत जास्त आहे. ज्याची गती सर्वांत जास्त, तो सर्वांत शक्तिमान असे विज्ञान सांगते. या न्यायाने प्रकाश हा दृष्य सृष्टीत सर्वात शक्तिमान ठरतो. प्रकाशाच्या सहाय्याने आपल्याला कोणतीही वस्तू पाहता येते पण प्रत्यक्ष प्रकाश मात्र अजून कोणीही, अगदी विज्ञानसुद्धा बघू शकलेले नाही. प्रकाश हा व्यक्त आणि अव्यक्त यांच्या सीमारेषेवर असल्याकारणाने अध्यात्माने त्याला अनन्यसाधारण महत्त्व दिले आहे. किंबहुना म्हणूनच सर्व धर्मांमध्ये प्रत्यक्ष प्रकाशाचा किंवा धूम्ररूपातील सुप्त प्रकाशाचा उपयोग ईश्वरी प्रार्थनेच्यावेळी केला जातो. हिंदू संस्कृतीतला सर्वात मोठा सण अर्थात दीपावली हा प्रकाशाच्या पूजेकरताच आपल्या पूर्वजांनी योजला आहे.

दीपावली या सामासिक शब्दाचा शब्दश: अर्थ म्हणजे दिव्यांची आवली, रांग. प्रत्येकजण परंपरेनुसार गोड-धोडाचा स्वयंपाक करून, दिव्यांची आरास करून किंवा फटाक्यांची आतषबाजी करून हा सण साजरा करतो. खऱ्या साधकाने अशी आनंदमयी दीपावली आपल्या कुटुंबाबरोबर, मित्र-मैत्रिणींबरोबर जरूर साजरी करावी, पण त्याही पलीकडे जाऊन खरी दीपावली म्हणजे काय हे सुद्धा या निमित्ताने समजावून घेतले पाहिजे.

जिथे प्रकाश असतो तिथे अंधार राहात नाही, नव्हे राहूच शकत नाही. त्यामुळे प्रकाशाची पूजा ही मूलतः अंधार नष्ट करण्यासाठी केली जावी. रात्री पडणाऱ्या भौतिक अंधाराबरोबरच इतरही अनेक रूपांनी अंधार आपल्याला ग्रासत असतो. आपण मानवी जन्मात आलो आहोत. रोजच्या रोज नव-नवीन, सुख-दुःखं आपण भोगत असतो, हा वस्तुत: आपल्या जीवनातील पहिला अंधार आहे. खरे तर ही सगळी सुख-दु:खं आपल्या पंचभूतात्मक देहापुरती मर्यादित असतात. या देहात निवास करणाऱ्या चैतन्याला, ज्याला आपण 'मी' म्हणतो त्याला, या सुख-दु:खांचा स्पर्शही होऊ शकत नाही. तरीसुद्धा सुख-दु:ख भोगण्याची क्रिया माणसाकडून घडते आणि त्याला कारण असते माणसाचे मन ! या मनामुळे, 'मी' सुखी किंवा दु:खी आहे असे आपल्याला भासते. कोऽहं – मी कोण? याचे निश्चित ज्ञान नसल्यामुळेच आपण सुख-दु:खामध्ये अधिकाधिक गुंतत जातो. स्वत:च्या स्वरूपाविषयीचे हे अज्ञान म्हणजे खरा अंध:कार ! या अंध:काराला नष्ट करणाऱ्या प्रकाशाची वाट आपल्याला माहीत नसल्याची किंबहुना त्या प्रकाशाबाबत आपण संपूर्ण अनभिज्ञ असल्याची जी आपण आपली समजूत करून घेऊन स्वत:चीच फसवणूक करून घेत असतो, तो असतो जीवनातला दुसरा अंध:कार !

दीपावलीनिमित्त दीपोत्सव साजरा करण्यामागचे मूळ तत्त्व वैदिक वाङमयातल्या बृहदारण्यक उपनिषदात मांडलेले आहे.

**असतो मा सद्गमय । तमसो मा ज्योतिर्गमय ।**
**मृत्योर्माऽमृतं गमय ।।** (बृहदारण्यक उपनिषद् १।३।२८)

याचा अर्थ, आम्हाला 'असत्' कडून 'सत्'कडे ने, अंधाराकडून प्रकाशाकडे ने आणि मृत्यूकडून मृत्यूविरहित अशा अमर अवस्थेकडे ने. आत्मज्ञानाच्या तेजोमय प्रकाशामुळे संसाराचा अंध:कारमयी भ्रम नाहीसा होऊन जीवनातले शाश्वत सत्य मनुष्याच्या लक्षात येईल, तेव्हाच तो जीवन-मृत्यूच्या फेऱ्यापलीकडे पोहोचेल असंच या प्रार्थनेतून आपल्या प्राचीन ऋषींना सुचवायचे आहे.

*** ज्ञानाचा दिवा प्रज्वलित करणारे सद्गुरुतत्त्व :**

अज्ञानाचा अंध:कार नाहीसा करून स्वबळावर आत्मज्ञान प्राप्त करण्यासाठी सामान्य मनुष्य असमर्थ असतो. कित्येक वेळेला भौतिक ज्ञान, पुस्तकी पांडित्य मिळाले की,''आता मी ज्ञानाने परिपूर्ण झालो'' अशी भ्रामक समजूत होऊन मनुष्य अज्ञानाच्या अंधारातच राहतो. धड इथला नाही आणि धड तिथला नाही अशी त्याची त्रिशंकू अवस्था होते.

या अर्धवट अवस्थेत न अडकता पुढील मार्गक्रमणासाठी मानसिक आणि आत्मिक बळ देऊन प्रकाशाच्या वाटेवर चालण्यासाठी जो आपल्याला मार्गदर्शन करतो, त्याला अध्यात्मात 'सद्गुरु' असे नामाभिधान आहे. परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद् वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांनी रचलेल्या श्रीदत्तात्रेय स्तोत्रामध्ये स्वामी महाराजांनी

श्रीदत्तात्रेयांना उद्देशून एकोणतीस विशेषणे योजली आहेत. भगवान श्रीदत्तात्रेय म्हणजे सद्गुरुतत्त्वाचे मूर्तिमंत अवतरण! श्रीगुरुदेव असे म्हटले की त्यापुढे दत्त या शब्दाशिवाय दुसरे काहीच येऊ शकत नाही. या एकोणतीस विशेषणांपैकी श्रीदत्तात्रेयांना योजलेले एक विशेषण म्हणजे 'दीपनं ज्ञानतेजसः', अर्थात साधकाच्या अंतःकरणात ज्ञानाचा दिवा प्रज्वलित करणारे श्रीगुरुदेवदत्त ! प्रत्येक सद्गुरुंमध्ये ही दत्तशक्ती आविर्भूत झालेली असतेच त्यामुळे हे विशेषण सद्गुरुतत्त्वालाच अनुलक्षून वापरलेले आहे. आगम ग्रंथ म्हणजेच वेद, उपनिषद इत्यादींतून जे ज्ञान मिळते त्याला आगम प्रमाण ज्ञान असे म्हणतात. याउलट प्रत्येक गोष्टीचा तौलनिक अभ्यास करून तर्कशास्त्राच्या आधारे जे अनुमान काढले जाते, त्याला अनुमानप्रमाण ज्ञान असे म्हटले जाते. सद्गुरुंकडून मिळणारे ज्ञान हे दोन्ही प्रकारचे ज्ञान आहे. पहिल्यांदा प्रत्यक्ष सद्गुरुंकडून ज्ञान मिळवले पाहिजे, त्यानंतर आगम ग्रंथांतील ज्ञानाचा उपयोग करून कोणताही पूर्वग्रह न बाळगता तर्कशास्त्रदृष्ट्या अनुमानही काढता आले पाहिजे आणि या दोन्हीचा उपयोग करून ज्ञानाचा दिवा प्रज्वलित करता आला पाहिजे. अर्थात्, अज्ञानमूलक गोष्टीच जर आपण वारंवार करत राहिलो तर सद्गुरुंनी कितीही ज्ञान दिले तरी ज्ञानाचा प्रकाश आपल्या अंतरात पडणारच नाही.

एक आंधळा मनुष्य होता. त्याला रात्रीच्या वेळी काही कामानिमित्त बाहेर जायचे होते. तेवढ्यात त्याला त्याचे सद्गुरु वाटेत भेटले आणि त्यांनी विचारले, ''तू आता एवढ्या रात्री कुठे चालला आहेस?'' यानेही काहीतरी तिरसटासारखे कारण सांगितले. मुळात त्या अंध मनुष्याचा स्वभाव रागीट होता. त्याचा ना अध्यात्मावर धड विश्वास होता, ना सद्गुरुंवर. पण तरीही ते त्याचे सद्गुरु होते त्यामुळे त्यांनी प्रेमाने सल्ला दिला, ''तू असं कर, जातोस आहेस एकटा, तर एक दिवा हातात घे आणि मग जा कुठे जायचे तिथे.'' हा त्यांना म्हणाला, ''मला काय उपयोग आहे दिव्याचा? मला कुठे दिसतंय? मी तर आंधळा आहे.'' ती वादविवादाची वेळ नव्हती, तेव्हा सद्गुरु म्हणाले, ''मला असं वाटतंय की तू दिवा बरोबर घेऊन जावास, कारण तुला जरी दिसलं नाही तरी समोरच्या माणसाला तू कोण आहेत ते दिसेल.'' हो-ना करता करता त्रासिक चेहरा करून त्या मनुष्याने शेजारी पडलेला एक दिवा उचलला आणि तो पुढे चालू लागला. चालता चालता त्याची पुढून येणाऱ्या एका मनुष्याशी टक्कर झाली. हा मुळात तिरसट, तेव्हा त्याने क्रोधित होऊन त्या माणसाला विचारले, ''काय हो तुम्हाला दिसत नाही का? तुम्ही खुशाल मला येऊन टक्कर देताय ! मी पडलो असतो ना खाली !'' त्यावर तो दुसरा मनुष्यसुद्धा रागाने म्हणाला, ''अहो मला एकवेळ दिसलं नाही पण तुम्हाला तरी कुठे दिसलं?'' तेव्हा तिरसट मनुष्य पुन्हा म्हणाला, 'अहो मी आंधळा आहे, मला कसं दिसेल? पण तुम्ही तर डोळस आहात ना? तुम्हाला कमीत कमी माझ्या हातातला दिवा तरी दिसायला हवा होता!'' तेव्हा तो दुसरा मनुष्य हसत हसत म्हणाला, ''अहो काय वेडे की खुळे तुम्ही! नुसताच दिवा हातात धरलाय पण तो पेटवणार कोण? आणि तो दिवा पेटवलाच नाही तर मला काय दिसणार कप्पाळ !''

सद्गुरुंनी एवढे सांगितले हो, पण दिवा ज्याचा त्यानेच प्रज्वलित करायला हवा ना ! असा दिवा प्रज्वलित करणे काही मनुष्याच्या हातून होत नाही आणि आंधळ्याप्रमाणे त्याच्या जीवनाचा प्रवास अडखळत, धडपडत, जीवनातल्या ठेचा खात सुरूच राहतो. शिवाय एक आंधळा दुसऱ्या आंधळ्याला, ''याला का दिसलं नाही'' असं म्हणत शिव्या देतच राहतो! वस्तुतः सगळेच आंधळे म्हटल्यावर दिवा काय अन् तो प्रकाश काय काही उपयोगच नसतो त्याचा ! सामान्य मनुष्य नुसताच अध्यात्माचा दिवा हातात घेतो आणि म्हणत राहतो की, ''मी अमुक पंथाचा आहे, अमुक नाम मी घेतो, अमुक मंत्रसाधना करतो.'' पण त्या साधनेचा खराखुरा प्रकाश देणारा दिवा लागला आहे का, याचे त्याला भान नसते. ज्याच्यात ज्योतच नाही असा मोकळा दिवा हातात असतो, अशा दिव्यामुळे आपलं आपल्यालाही दिसत नाही आणि दुसऱ्याला त्याहून दिसत नाही ! डोळस असून आंधळेपणाचे सोंग घेणाऱ्या माणसाची अवस्था ही अशीच होते. त्याला ज्ञानप्राप्ती होत नाही कारण सगळी इंद्रियं एकवटून तो कधी ऐकतच नाही. जे काही शब्द ऐकतो ते काहीतरी पूर्वग्रह मनात ठेवून ऐकतो आणि त्यामुळेच थोड्यावेळाने ते विसरूनही जातो. अज्ञानाचे अंधःकाराचे हरण केवळ आत्मज्ञानरूपी 'सोऽहं-तोच मी' या ज्ञानप्रकाशाने होते.

मानवी जीवनाचं खरं प्रयोजन काय याचा विचार करता त्याला काही ना काही मार्गाने सद्गुरुतत्वाकडून मार्गदर्शन नक्कीच मिळते. देहाला जी काही सुख-दुःखं होत आहेत ती होऊ देत, पण मला आत्मज्ञान झालं पाहिजे हा निश्चय निर्माण होण्यासाठी सद्गुरुंसमोर निस्सीम शरणागती स्वीकारावी लागते. ही शरणागती पूर्ण झाल्यावर सतत तेजाचा आणि शक्तीचा प्रवाह आपल्यामध्ये प्रवाहित होऊ लागतो. ही आपोआप घडणारी प्रक्रिया असते, यात चमत्काराचा भाग काहीच नाही. हे समजण्यासाठी विज्ञानातले एक उदाहरण घेऊया. समजा एक गरम पाण्याने भरलेले पात्र आणि एक गार पाण्याने भरलेले पात्र अशी दोन्ही पात्रे एकमेकांशेजारी ठेवली. खालच्या बाजूला नळी लावून ही दोन्ही पात्रे एकमेकांना जोडून टाकली आणि नळीत कुठलाही अडसर असणार नाही याची खबरदारी घेतली. तर गरम पाणी आपोआप गार पाण्याच्या दिशेने वाहू लागेल. तसेच सद्गुरुतत्वासमोर जाताना शंकांचा, किल्मिषांचा अडसर काढून टाकून शरणागतीचा बांध सद्गुरुंशी जोडला तर त्या सद्गुरुंमध्ये स्फुरित झालेली ब्रह्मशक्ती आपल्यातही स्फुरित होईल यात काही शंका नाही. अशी शरणागती साधण्यासाठी मनातला जो विकल्पांचा अंधार आहे तो जाणीवपूर्वक दूर करता यायला हवा. आपली अशी भावना पाहिजे की, 'माझ्यासमोर जे सद्गुरुतत्व सदेह साकार झाले आहे, ते रूपाने कमी-जास्त असू दे, धनाने किंवा



भौतिक जगातल्या ज्ञानानेही कमी-जास्त असू दे पण माझी निष्ठा, माझी श्रद्धा अढळ आहे. ते सांगतील त्या प्रत्येक गोष्टीचे मी तंतोतंत पालन करेन. कारण त्यांच्या आज्ञेपेक्षा श्रेष्ठ असे काहीच या जगात नाही.'

उपनिषदातल्या तात्पर्यानुसार ईश्वरी शक्तीशी नाते सांगणारा आपल्यातला आंतरप्रकाश आणि प्रत्यक्ष ईश्वरी तत्व यांच्यातले मनाने मानलेले अंतर हाच आपल्या मनातील अज्ञानाचा अंध:कार आहे. हे दूरत्व जेव्हा नाहीसे होईल तेव्हा त्याबरोबरच जीवनातला सर्व अंध:कारही कायमचा संपलेला असेल. एखादी पणती पेटवण्यासाठी आवश्यकता असते ती वात, तेल आणि अग्नीची. या तिन्हींच्या एकत्रीकरणाशिवाय प्रकाशाची निर्मिती होत नाही आणि परिणामत: अंध:काराचा नाशही होत नाही. आपल्या **जीवनातील अंध:काराचा नाश होण्याकरिता कर्माची वात, भक्तीचे तेल आणि आत्मजाणीवेची ज्योत लावून, ज्ञानाचा प्रकाश निर्माण करण्यासाठी सद्गुरुतत्वासमोर संपूर्ण शरणागती स्वीकारण्याचा संकल्प या दीपावली निमित्त केला तरच आपल्याला दीपावलीचा खरा अर्थ कळला असे म्हणता येईल !**

***



**श्री समर्थ सेवा मंडळ सज्जनगड,**
**संत ज्ञानपीठ सांस्कृतिक केंद्र**



**समर्थ सदन, १७९, सोमवार पेठ, सातारा. फोन : ०२१६२/२८४०१६**

## कायम निधी-योजना

**सादर जय रघुवीर,**

**संत आनंदाचे स्थळ । संत सुखचि केवळ ।**
**नाना संतोषाचे मूळ । ते हे संत ।।**

संत ज्ञानपीठाद्वारे दरवर्षी चातुर्मास कार्यक्रम व दासनवमी उत्सव असे सांस्कृतिक कार्यक्रम नित्यनेमाने गेली ३० वर्षांहून अधिक काळ होत असतात. संत ज्ञानपीठ येथील सांस्कृतिक कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी रु. २०००/- कायम निधी योजना आखली आहे. या निधीच्या व्याजातून संत ज्ञानपीठाचे चातुर्मास, दासनवमी उत्सव असे वार्षिक कार्यक्रम व्हावेत अशी योजना आहे. आपण या योजनेत सहभागी व्हावे ही विनंती. चेक/ड्राफ्ट समर्थसदन सांस्कृतिक केंद्र या नावाने पाठवावा.

o आपले नम्र o

मारुतीबुवा रामदासी (कार्यवाह)
ॲड. डॉ. डी. व्ही. देशपांडे (कार्याध्यक्ष)
गुरुनाथ महाराज कोटणीस (अध्यक्ष)
योगेशबुवा रामदासी (अध्यक्ष)



## मनोबोध विशारद परीक्षेसंबंधीचे प्रगटन

श्रीसमर्थ विद्यापीठाच्यावतीने १ जानेवारी २०१४ ते ऑक्टोबर २०१४ या कालावधीत 'मनोबोध विशारद' ही परीक्षा घेतली जाणार आहे. विद्यार्थ्यास 'मनोबोध विशारद' ही उपाधी (प्रमाणपत्र) दिली जाते.

या परीक्षेसाठी दि. **१/११/१३ ते ३१/१२/१३** या दोन महिन्यांच्या कालावधीत विद्यापीठातर्फे प्रवेश दिला जाईल. अभ्यासक्रम **१/१/१४** पासून सुरू होईल.

या परीक्षेसाठी पात्रता-ज्या विद्यार्थ्यांनी पत्रद्वारा दासबोध किंवा ग्रंथराज दासबोध याची शेवटची प्रबोध परीक्षा किंवा समर्थ विद्यापीठाची 'मुमुक्षु' ही परीक्षा किंवा गीताधर्म मंडळाची परीक्षा यापैकी कोणतीही एक परीक्षा दिली असेल तर तो विद्यार्थी या परीक्षेस प्रवेश घेणेस पात्र राहील.

प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यांनी विद्यापीठाच्या सातारा येथील प्रधान कार्यालयाकडे प्रवेश फी रु. १००+ रु. ३०/- टपालखर्च असे एकूण रु. १३०/- रोख/म.ऑ./डी.डी. ने पाठविल्यास अभ्यासक्रमाची माहिती पुस्तिका, प्रवेश अर्ज विद्यापीठाकडून पाठविण्यात येईल. त्यात अधिक तपशीलवार माहिती मिळेल. चेकने पैसे पाठविल्यास वटणावळीचे रु.३०/- जादा पाठवावेत. रक्कम पाठविताना विद्यार्थ्याने पूर्ण नाव, पत्ता, दूरध्वनी क्र. कळवावा. चेक/डी.डी. 'श्रीसमर्थ विद्यापीठ, शिवथरघळ' या नावाने सातारा प्रधान कार्यालयाकडे पाठवावा. **३१/१२/१३** नंतर प्रवेश दिला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**- ॲड. डी. डी. व्ही. देशपांडे** (कुलसचिव)
श्रीसमर्थ विद्यापीठ, शिवथरघळ.

*** विद्यापीठाचा पत्ता ***
**श्रीसमर्थ विद्यापीठ, प्रधान कार्यालय,**
समर्थ सदन, १७९, सोमवार पेठ,
सातारा, ता. जि. सातारा.
दूरध्वनी क्र. : ०२१६२/२८०७१६, २८२३१६.